02-03-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 03/01/2025 10:57 PM Page 1



# मडगावात आज कार्निव्हल मिरवणूक

## नौदलाचा चित्ररथ ठरणार आकर्षण | विद्यार्थी करणार वयस्क पालकांची खबरदारी घेण्यासंदर्भात जागृती

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १ : मडगावात उद्या रविवारी २ मार्च रोजी मडगाव नगरपालिकेने पर्यटन खात्याच्या सहकार्याने आयोजित केलेली कार्निव्हल चित्ररथ मिरवणूक होणार आहे. या मिरवणुकीत नौदलाचा चित्ररथ लक्ष वेधून घेणारा ठरणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थी आपल्या वयस्क पालकांची खबरदारी कशी घ्यावी, यासंदर्भात जागृती करणार आहेत.



मडगाव: पत्रकार परिषदेत माहिती देताना नगराध्यक्ष दामोदर शिरोडकर, आयोजन समितीचे अध्यक्ष नगरसेवक कामिल बार्रेटो बाजूला उपनगराध्यक्ष बबिता नाईक, आयोजन समितीचे इतर पदाधिकारी, मुख्याधिकारी मेल्वीन वाझ, नगरसेवक व इतर.

मडगावात घेतलेल्या पत्रकार परिषदेत मडगाव कार्निव्हल आयोजन समितीचे अध्यक्ष कामिल बार्रेटो व नगराध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी उपनगराध्यक्ष बबिता सदानंद नाईक, सत्ताधारी गटाचे नगरसेवक, मुख्याधिकारी मेल्वीन वाझ, नगरपालिकेचे मुख्य अभियंते दीपक देसाई व इतर मान्यवर उपस्थित होते.

आयोजन समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक कामिल बार्रेटो यांनी सांगितले की, मडगाव कार्निव्हल मिरवणूक येथील होली स्पिरीट चर्चकडून रविवारी सायंकाळी सुरू होणार असून, नगरपालिका चौकापर्यंत येणार आहे. त्यात गोव्याची पारंपरिक व आधुनिक संस्कृतीचा मिलाफ दिसून येणार आहे. लोकनृत्य व चित्ररथांचे सादरीकरण होणार आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याहस्ते या मिरवणुकीचे उद्घाटन होणार आहे. यावेळी पर्यावरणमंत्री आलेक्स सिक्वेरा, मडगावचे आमदार दिगंबर कामत, आमदार उल्हास तुयेकर, आमदार आलेक्स रेजिनाल्ड लॉरेन्स, आमदार विजय सरदेसाई व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मिरवणूक आयोजित करण्यासाठी पर्यटन खात्याचे भरघोस पाठिंबा मिळाला आहे. मिरवणूक सुरळीत पार पडावी यासाठी पोलिस, वाहतूक पोलिस चोख बंदोबस्त ठेवणार आहेत व आवश्यक कुमक पुरवणार आहेत. मडगाव नगरपालिका क्षेत्रातील २५ ही प्रभागात खेळ तियात्र होणार आहेत. मडगाव नगरपालिकेच्या नगरसेवकांचा समावेश असलेली आयोजन समिती कार्निव्हल मिरवणूक सुरळीत व्हावी यासाठी प्रयत्नरत आहेत. मोठ्या संख्येने या मिरवणुकीत सहभागी होण्याचे आवाहन आयोजन समितीचे अध्यक्ष कामिल बार्रेटो यांनी केले.

नगराध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी सांगितले की, मडगाव कार्निव्हल मिरवणूक यशस्वी करण्यासाठी सध्या जय्यत तयारी सुरू आहे. या मिरवणुकीत आकर्षक चित्ररथांबरोबर समाजप्रबोधन करणारे चित्ररथ, पथके सहभागी होणार आहेत. नौदलाच्या अधिकाऱ्यांनी आपल्याशी संपर्क साधून चित्ररथ मिरवणुकीत असणार असल्याचे सांगितले आहे. नौदलाचा हा चित्ररथ खास आकर्षण व समाजप्रबोधन करणारा ठरणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थी ही आपल्या वयस्क पालकांची कशी खबरदारी घ्यावी, यासंदर्भात जनजागृती या मिरवणुकीच्या माध्यमातून करणार आहे. यावर्षी पर्यटन खात्याने कार्निव्हल मिरवणुकीसाठी व बक्षिसांच्या रकमेतही वाढ केली आहे. पोलीस, वाहतूक पोलीस, अग्निशमन दल ही मिरवणूक सुरळीत पार पडण्यासाठी आपली जबाबदारी चोख पार पाडणार आहेत. मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन नगराध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी केले.

पान १ वरून

### काशिनाथ शेट्ये एक पाऊल पुढे

समजेल. आमदार संकल्प आमोणकर यांचा संदर्भ देत त्यांनी म्हटले की, आमदारांनी मला मारले नाही किंवा थेट धमकी दिली नाही. मात्र, आमदारांनी सांगितले की मी पुन्हा आलो तर ते लोक मला मारू शकतात. आमदार म्हणून त्यांनी कायद्यांचे पालन करायला हवे. आम्ही एक वाट देण्यास तयार आहोत, परंतु ती प्रक्रिया कायदेशीर मार्गानेच पूर्ण करावी, असे आवाहन शेट्ये यांनी केले. दरम्यान, मुरगावचे आमदार संकल्प आमोणकर यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना शेट्ये यांनी पक्षपातीपणा केला असल्याचा आरोप केला. ५० वर्षांहून अधिक काळ अस्तित्वात असलेल्या मार्गाला अचानक बंद करण्याचा प्रयत्न सुरू आहे. तसेच, शेट्ये यांनी वीज केबल्स हटवण्याच्या निर्णयाला लोकांनी विरोध केल्याचा दावा चुकीचा आहे, असे आमोणकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या संपूर्ण प्रकरणावर वीज विभागाचे मुख्य अभियंता स्टीफन फर्नांडिस यांनी सांगितले की, शेट्ये यांनी घेतलेली भूमिका कायदेशीर असून, स्थानिक रहिवाशांसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करून देता येईल का, याचा विचार केला जात आहे.

### मांद्रे हत्याप्रकरणी दीपन बत्राला न्यायालयीन कोठडी

नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. आमदार जीत आरोलकर यांनी बिगर गोमंतकीय पर्यटक आणि दिल्लीतील रिअल इस्टेट व्यावसायिक गोव्यात येऊन जमिनी विकत घेतल्यानंतर बेकायदेशीर व्यवहार आणि दादागिरी करत असल्याचे सांगितले. अशा घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी स्थानिक नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

### 'रेरा'कडून नियमभंग करणाऱ्या बिल्डरला ५ लाखांचा दंड

हेतुपुरस्सर त्रास देणारी असल्याचा दावा केला. मात्र, 'रेरा' ने सर्व बाजूंनी तपासणी करून निर्णय घेत, नियमांचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट केले आणि दंडाची कारवाई अमलात आणली.

### पणजीत पर्यटक टॅक्सी पार्किंगवर निर्बंध

अडचणींवर हा निर्णय तोडगा काढेल, असे (गोवाकॅन) चे समन्वयक रोलँड मार्टिन्स यांनी सांगितले. जागतिक ग्राहक हक्क दिनाच्या पार्श्वभूमीवर, ग्राहक मंच आणि ग्राहक कल्याण क्लबच्या स्वयंसेवकांना एकत्र आणून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात तक्रारी नोंदवण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# मये मतदारसंघ कचरामुक्त, नितळ ठेवणार

## आमदार प्रेमेंद्र शेट : मये पंचायतक्षेत्रात एमआरएफ शेडचे उद्घाटन

टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १ :** निसर्गाचा संपन्न वारसा लाभलेल्या मये गाव तसेच मतदार संघ कचरा मुक्त सुंदर स्वच्छ ठेवण्यासाठी सामाजिक जबाबदारी स्वीकारून प्रत्येकाने पंचायतीकडे आपला कचरा द्यावा. कोणत्याही प्रकारे कसलाच कचरा सार्वजनिक रस्त्यावर ठिकाणी फेकू नये सर्वांनी जनतेला आदर्श घालून देताना कचरामुक्त मतदारसंघ करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन मयेचे आमदार प्रेमेंद्र शेट यांनी केले.

मये पंचायत इमारत जवळ सुमारे वीस लाख रुपये खर्चून नवी एमआरएफ शेड उभारण्यात आली आहे. याचे नुकतेच उद्घाटन आमदार प्रेमेंद्र शेट यांनी केले.



मये : एमआरएफ शेड व कचरा प्रक्रिया मशीनच्या उद्घाटनप्रसंगी आमदारप्रेमेंद्र शेट, शंकर चोडणकर, सरपंच कृष्णा चोडणकर, गटविकास अधिकारी ओंकार मांद्रेकर, दया कारबोटकर, सचिव महादेव नाईक पंचायत सदस्य व इतर.

या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचा कचरा स्वीकारण्यात येणार येणार आहे.तसेच या ठिकाणी प्लास्टिक व इतर कचऱ्यावर मशीन द्वारे प्रक्रिया करून हा कचरा इतर ठिकाणी प्रक्रियेसाठी देण्यात येणार आहे. मुख्यमंत्र्यांनी कोणत्याही परिस्थितीत आपापले पंचायत विभाग नितळ सुंदर स्वच्छ ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत त्याचे प्रत्येकाने पालन करावे.

आम्ही सर्व पंचायत विभागात एमआरएफ शेड कचरा गोळा करण्यासाठी केंद्र सुरू करीत असून त्याला सहकार्य करण्याचे आवाहन आमदार शेट यांनी केले.

यावेळी सरपंच कृष्णा चोडणकर जिल्हा अध्यक्ष शंकर चो ड ण कर दयानंद कारबोटकर, गटविकास अधिकारी ओंकार मांद्रे कर विविध पंचायतीचे सरपंच सदस्य ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी सरपंच कृष्णा चो ड ण कर यांनी पंचायत क्षेत्रातील सर्व प्रभागातून लोकांनी कचरा गोळा करण्यासाठी पंचायतीला सहकार्य करावे. सार्वजनिक ठिकाणी कुठेही कोणताही कचरा टाकू नये स्वच्छ सुंदर नितळ पंचायत म्हणून मयेची गणना व्हावी यासाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन केले. जिल्हा अध्यक्ष शंकर चोडणकर यांनी कचरामुक्त मतदारसंघ करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

आमदार शेट यांच्या हस्ते शेडचे उद्घाटन झाले. तसेच कचरा प्रक्रिया प्रकल्प मशीनरीचेही उद्घाटन करण्यात आले. तुळशीदास चोडण कर यांनी सूत्रसंचालन केले.

# केरी पेडणे पठारावर बेकायदा पॅराग्लायडिंग

टीम दैनिक हेराल्ड

**▶स्थानिकाविरोधात गुन्हा नोंद : साहित्यही पर्यटक पोलिसांनी केले जप्त**

**पेडणे, दि. १ :** केरी पेडणे पठारावर बेकायदेशीर पॅराग्लायडिंग करणाऱ्या राजू गवंडी तळवाडा पेडणे याला पर्यटक पोलिसांनी पकडून त्यांच्याकडून साहित्य जप्त केले. गेल्या महिन्यात या ठिकाणी झालेल्या पॅराग्लाइडिंग अपघातात पर्यटक युवतीचा मृत्यू झाला होता .

केरी आजोबा मंदिर पठारावर यापूर्वी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर पॅराग्लायडिंग पर्यटक करत असल्याचे चित्र दिसून येत होते. या ठिकाणी कसल्याच प्रकारच्या पॅराग्लायडिंग व्यवसायाला परवाने देऊ नयेत. यासाठी केरी ग्रामसभेमध्ये ठरावही मंजूर करण्यात आला होता. परंतु गेल्या महिन्यात या ठिकाणी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर पॅराग्लाइडिंग करत असताना एका पुणे येथील युवतीला जीव गमवावा लागला होता. त्यानंतर सरकारने कोस्टल पोलिसांनी धडक मोहीम उभारून कोणत्याच प्रकारचे बेकायदेशीर पॅराग्लायडिंग जे व्यवसाय करतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी पावले उचलली होती. तरीही गुरुवारी स्थानिक राजू गवंडी हा स्वतः पॅराग्लायडिंग साहित्य घेऊन केरी डोंगर पठारावर पॅराग्लायडिंग करत असल्याची तक्रार आल्यानंतर लगेच घटनास्थळी पर्यटक पोलिसांनी धाव घेऊन त्यांच्याकडून सर्व प्रकारचे साहित्य जप्त करून गुन्हा नोंदवला.


**यूनियन बैंक ऑफ इंडिया / Union Bank of India** — भारत सरकार का उपक्रम / A Government of India Undertaking

**विद्यानगर शाखा, जुन्या चौगुले कॉलेजजवळ, विद्यानगर, घोगळ, मडगाव, गोवा 403601**

**कब्जा सूचना**

ज्याअर्थी, खाली सही करणारा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 खाली युनियन बँक ऑफ इंडियाचा प्राधिकृत अधिकारी आहे आणि सदर कायद्याच्या कलम 13(2) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 3 खाली त्यास प्रदान झालेल्या अधिकारांचा वापर करून त्याने विद्यानगर शाखा येथील कर्जदार 1(अ) **श्रीमती महालक्ष्मी स्टील ट्रेडर्स, प्रोप्रा. श्रीमती सुमन एस. सरदेसाई** (मयत), गाळा क्र. सी-जी -5 व सी-जी-6, देवराई बिल्डींग, पॉवर हाऊस रोड, आके, मडगाव, गोवा, 1 **(ब) श्री. सतीश चिंतामणी सरदेसाई,** राहणार, घर क्र. 1630, श्री साईबाबा मंदिरासमोरील, तळेबांध, आके-आल्त मडगाव, गोवा आणि मयत **श्रीमती सुमन सतीश सरदेसाई** यांची मिळकत, द्वारा प्रतिनिधित्व **(अ) श्री. सतीश चिंतामणी सरदेसाई, (ब) श्री. श्रीपाद सतीश सरदेसाई, (क) कु. प्रीता सतीश सरदेसाई, (ड) बँकेस ज्ञात नसलेले अन्य कोणतेही कायदेशीर वारस,** राहणार घर क्र. 1630, श्री साईबाबा मंदिरासमोर, तळेबांध, आके-आल्त मडगाव, गोवा यांना सदर मागणी सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत सदर सूचनेत दिलेल्या दि. 01.12.2024 रोजी देय **रु. 30,60,020.90 (रु. तीस लाख साठ हजार वीस व पैसे नव्वद फक्त)** अधिक त्यावर साठलेले व्याजासहितच्या रकमेची परतेड करावी, अशी मागणी सूचना पाठवली होती.

कर्जदारांस या रकमेची परतेड करण्यात अपयश आल्याने कर्जदार व तमाम लोकांना याद्वारे नोटीस देण्यात येते की, खाली सही करणाऱ्याने सदर कायद्याच्या कलम 13 (4) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8 खाली त्यास प्रदान झालेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा **26.02.2025** या दिवशी घेतला आहे.

खासकरून कर्जदार आणि तमाम लोकांना इशारा देण्यात येतो की त्यांनी या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि त्यांनी केलेला असा कोणताही व्यवहार युनियन बँक ऑफ इंडियास देय असलेल्या **रु. 30,60,020.90 दि. 01.12.2024** पासून कंत्राटी दराने त्यावर साठलेल्या व्याजासहित रकमेच्या भारास लागू होईल.

सदर मालमत्ता पुन्हा मिळवण्यासाठी उपलब्ध वेळेसंबंधी सदर कायद्याच्या कलम 13 मधील उपकलम (8) कडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

मडगाव नगरपालिका हद्दीत दक्षिण गोवा जिल्ह्यातील सालसेत तालुक्यात मडगाव शहराच्या आल्त आके येथील मरड या नावाच्या स्थावर मालमत्तेत बांधलेल्या देवराय सी इमारतीत 66.22 चौ.मी. एकूण सुपर बिल्ट अप क्षेत्रफळासह तळमजल्यावरील गाळा क्र. सी/जी-5 व सी/जी-6 आणि तो पीटी शीट क्र. 227 च्या चलता क्र. 141 ते 152 खाली स्वतंत्रपणे सर्वेक्षित दक्षिणेकडील 1/3 भाग आहे आणि मडगाव शहरासंबंधीच्या मात्रिज क्र. 214 खाली सालसेत मडगाव गोवा येथील महसूल कार्यालयात नोंदवलेला आहे व नवीन मालिकेच्या खंड बी-89 च्या पृष्ठ 3 वर भू नोंदणी क्र. 34491 खाली मडगाव शहर सर्वेक्षणात वर्णिलेला आहे. सदर गाळ्याच्या **चतु:सीमा : पूर्वेस** : गाळा क्र. सी/जी-7, **पश्चिमेस** : गाळा क्र. सी/जी-4, **उत्तरेस** : सदर प्लॉट ए चा उर्वरित भाग, **दक्षिणेस** : आके-दवर्ली रस्ता.

**दि. 26.02.2025**
**ठिकाण : मडगाव, गोवा**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**


## मांद्रेत पेडणे तालुका भंडारी समाजाची आज सभा

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. १ : पेडणे तालुका गोमंतक भंडारी समाजाच्या केंद्रीय समितीची सभा रविवार, दि. २ मार्च रोजी संध्या ४.३० वाजता श्री महाकाळ मंदिर, मधला माज, मांद्रे येथे आयोजित केल्याची माहिती.पेडणे तालुका गोमंतक भंडारी समाजाचे अध्यक्ष शिवकुमार आरोलकर यांनी दिली आहे. या सभेत स्वागत, मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे,सेमिनार आयोजनाबाबत चर्चा करणे व अध्यक्षाच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. समाज बांधवांनी या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, अशी विनंती समाज अध्यक्ष आरोलकर यांनी केली आहे.


**CHANGE IN NAME**

I, **ANDRE CARVALHO,** resident of **H NO 1107/A COLLEANDONGOR RAIA SALCETE, SOUTH GOA, South Goa, 403720,** Goa, INDIA would like to change my name from **ANDREW ANTONIO CARVALHO** to **ANDRE CARVALHO.** Hereafter in all my dealings & documents, I will be known by my name **ANDRE CARVALHO.**

**TRANSFER OF VEHICLE**

I **SMT MINAKSHI SANJAY NAIK** wife of **LATE. SANJAY JANARDAN NAIK** R/o, **H.NO. 4/261, AGARWADDO CALANGUTE, BARDEZ GOA 403516** would like to transfer the **(TVS JUPITER, Bearing Reg. No. GA-03-AS-1896)** on my name. Any person having any claim or objection in this regards shall intimate to the **RTO, MAPUSA** within 15 days from the date of publication of the notice.

SD/-
**MINAKSHI SANJAY NAIK**

**CHANGE OF NAME**

I, **ADITI AMBIKESH SINARI,** R/o. Flat No. EUG-2, Akar Habitat, Opp Costa Factory, Aquem, Margao, South Goa 403601 hereby change my name from **SONIYA ASHOK SAPLE** to **ADITI AMBIKESH SINARI.** Hereafter in all my dealings & documents, I will be known by the name **ADITI AMBIKESH SINARI.**

*Sandeep Ads*

**Transfer of Vehicle**

I Mr. Caitano Dsouza, R/o Cobra Vaddo, Calangute, Bardez, Goa wish to transfer the vehicle Innova Ertiga bearing registration no. GA 03 N 6170 in my name which was registered in the name of my late wife Celina Maria Dsouza.

Any person is/are having any objection to the said transfer of vehicle, should submit the same in the Office of Transport Department, Mapusa, Goa.

**Government of Goa**
**OFFICE OF THE CIVIL REGISTRAR CUM SUB REGISTRAR & NOTARY EX-OFFICIO, PONDA**
Rajdeep Galleria, First Floor, Sadar, Ponda Goa.
Phone/Fax 9405864626,
E-mail:crsrponda-rd.goa@nic.in

CR/SR/PON/195/2025
Dated:- 24/02/2025

**NOTICE**

Dr. Gouresh G. Bugde, Civil Registrar-cum-Sub Registrar-I and Special Notary Ex-Officio of this Judicial Division of Ponda Goa.

In accordance with Section 346 (11) of "The Goa Succession, Special Notaries and Inventory Proceeding Act, 2012" it is hereby made public that by Notarial "Deed of Declaration of Heirship" drawn by and before me on 21st day of February of the Year Two Thousand and Twenty Five at pages 111 onwards of Book No. 441 of this office, the following is recorded;

That on Thirtieth Day of September, Two Thousand And Twenty Four (30/09/2024), died Shri Rohidas Raghoba Naik alias Rohidassa Ragoba Naique, at Tamshirem, Borim, who was permanent resident H.No.271, Tamshirem, Borim, Ponda, Goa, died intestate without any Will, gift or any other testamentary disposition of his last wishes in respect of his estates, leaving behind him, his widow/wife Smt. Nomu Rohidas Naik also known as Nomum Ramachondra Naique, widow, Indian National, as 'Moiety Holder/Half Sharer' and his only Son Shri Sameer Rohidas Naik, son of late Rohidas Raghoba Naik, major, married to Yesheshri Vasudev Karapukar changed to Shraddha Sameer Naik, Indian Nationals and as 'Universal Legal Heirs' to this Deed.

That besides the said Heirs there does not exists any other person or persons according to Law of Succession prevailing in the State of Goa who may concur with them to the estate left by the deceased person.

Any person having objection to this Deed may file their objection in this office within one month from the date of its publication.

SEAL Sd/- **(Dr. Gouresh G. Bugde)**
Special Notary, Ponda Goa
Dated: 24/02/2025
Place: Ponda




शिवोली: श्री साई दिगंबर महिला भजनी मंडळाचा सन्मान करताना चंद्रकांत चोडणकर,सोबत झिला पेडणेकर.

# साई दिगंबर महिला भजनी मंडळाचा सन्मान

टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. १:** येथील श्री देव शिवलिंग मंदिरात आसगाव येथील श्री साई दिगंबर महिला भजनी मंडळाचा सन्मान करण्यात आला. माजीमंत्री चंद्रकांत चोडणकर यांच्या हस्ते मंडळाला सन्मानित करण्यात आले. यावेळी मंदिराचे संस्थापक अध्यक्ष झिला पेडणेकर उपस्थितीत होते. झिला पेडणेकर यांनी भजनी मंडळाची प्रशंसा केली. कला अकादमी आयोजित स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल कौतुक केले. या मंडळाचे भवितव्य उज्वल आहे. देवस्थानतर्फे इतर भजनी मंडळानेही असेच प्रोत्साहन दिले जाणार असल्याचे ते शेवटी म्हणाले.


**केनरा बैंक Canara Bank** — भारत सरकार का उपक्रम / A Government of India Undertaking — सिंडिकेट Syndicate

**मडगाव शाखा**
पोस्ट पेटी क्र. 500, लुईस मिरांडा रोड, नगरपालिका स्क्वेअर, मडगाव, सालसेत, दक्षिण गोवा, गोवा 403601. मोबा. क्र. 7774005713, ईमेल आयडी: cb0314canarabank.com

संदर्भ क्र. आरएन/314/एसएसएस/01 — दि. 26/02/2025

**विमोचन नोटीस**

प्रति,

| | |
|---|---|
| **श्री. स्वेतन संतोष सिमीपुरुषकर**<br>**घर क्र. ईडब्ल्यूएस-872 हाऊसिंग बोर्ड (पार्ट), घोगळ, मडगाव, गोवा 403601** | **श्रीमती शांती स्वेतन सिमीपुरुषकर**<br>**घर क्र. ईडब्ल्यूएस-872 हाऊसिंग बोर्ड (पार्ट), घोगळ, मडगाव, गोवा 403601** |

**विषय :** सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (यानंतर सदर कायदा असा संदर्भ राहील) च्या कलम 13(8) खाली विमोचन (रिडेम्प्शन) चा अधिकार गाजवण्यासाठीची नोटीस.

खाली सही करणारा **कॅनरा बँक, मडगाव शाखा, गोवा** (यानंतर सदर सुरक्षित धनको असा संदर्भ राहील) यांचा सदर कायद्याखाली नेमणूक झालेला प्राधिकृत अधिकारी असून याद्वारे सदर कायद्याच्या कलम 13(8) सह सरफासी नियमांच्या नियम 8(6) खाली तुम्हाला याद्वारे नोटीस देतो ती खालीलप्रमाणे:

तुम्हां सर्वांना हे माहित आहेच की, सुरक्षित धनकोने सदर कायद्याच्या कलम 13(2) खाली दि. **16/11/2024** रोजी **कर्जदार श्री. स्वेतन संतोष सिमीपुरुषकर (कर्जदार) व श्रीमती शांती स्वेतन सिमीपुरुषकर (कर्जदार),** गहाणवटदार व हमीदार (वर नाव दिलेले) यांना सदर मागणी सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत **रु. 18,82,999.47/- (रु. अठरा लाख ब्याएंशी हजार नऊशे नव्याण्णव व पैसे सत्तेचाळीस फक्त)** व त्यावर साठलेल्या व्याजाचा भरणा करावा, अशी मागणी सूचना पाठवली होती.

कर्जदार, गहाणवटदार व हमीदारांना (वर नाव दिलेले) वरील सदर मागणी सूचनेत दिलेल्या रकमेची परतेड करण्यात अपयश आल्याने प्राधिकृत अधिकाऱ्याने सदर कायद्याच्या कलम 13(4) खाली दि. **11/02/2025** रोजीच्या कब्जा सूचनेत वर्णिलेल्या सुरक्षित मालमत्तांचा प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.

सदर सरफासी कायदा, 2002 सह सरफासी नियमांच्या नियम 8(6) खाली तरतुदींची अंमलबजावणी वा पालन करण्यासाठी ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून 30 दिवसांच्या आत दि. **16/02/2025** रोजी देय असलेल्या **रु. 18,40,716.47/- (रु. अठरा लाख चाळीस हजार सातशे सोळा व पैसे सत्तेचाळीस फक्त)** अधिक त्यानंतर त्यावर साठलेले व्याज, किमती व खर्चांसहितच्या रकमेची पूर्ण परतेड करून सुरक्षित धनकोच्या ताब्यात असलेल्या सुरक्षित मालमत्ता पुन्हा घेण्यास व त्यावर पुन्हा दावा लावण्यास तुम्हाला ही शेवटची व अंतिम संधी याद्वारे दिली जात आहे अन्यथा सदर कायद्याखाली सदर सुरक्षित मालमत्ता विकण्यासाठी येथे खाली दिलेल्या पुढील प्रणालींपैकी एका प्रणालीने वर्तमानपत्रांमधून विक्री सूचना प्रसिद्ध केली जाईल: 1) अशा सुरक्षित मालमत्तांमध्ये व्यवहार करणाऱ्या किंवा त्यात विकत घेण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींकडून निविदा मागवून, किंवा 2) लोकांकडून निविदा मागवून किंवा 3) ई-लिलाव प्रणालीसह जाहीर लिलाव घेऊन किंवा 4) खाजगी निविदा मागवून.

सदर कायद्याच्या कलम 1(8) अनुसार, वर्तमानपत्रात विक्री सूचना प्रसिद्ध करण्याच्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी सदर सुरक्षित मालम्ता पुन्हा मिळवण्याचा तुम्हाला अधिकार आहे अन्यथा सदर कायद्याच्या कलम 13(8) अनुसार गहाण ठेवलेली मालमत्ता पुन्हा मिळवण्याचा तुमचा अधिकार रद्दबातल होईल.

सदर कायदा / किंवा कोणत्याही अन्य अमलात असलेल्या कायद्याखाली सुरक्षित धनकोस उपलब्ध असलेल्या कोणत्याही अन्य हक्कांच्या पूर्वग्रहाशिवाय ही नोटीस दिली जात आहे.

**दिनांक 26/02/2025**
**ठिकाण: मडगाव**

**प्राधिकृत अधिकारी**
**कॅनरा बँक**

**Proclamation for person Absconding Section 82 Cr.P.Code**

**IN THE COURT OF JUDICIAL MAGISTRATE FIRST CLASS AT BICHOLIM -GOA**

878/OA/138/2019/B/C

The Bhatagram Urban Co-operative Credit Society Ltd. ...Complainant
V/s
Mr. Vishwanth Vasu Morajkar and ors ...Accused

WHEREAS a complaint has been made before this Court that the accused - Mr. Vishwanth Vasu Morajkar, r/o House no:- 46, Mandrekarwada, Bicholim - Goa has committed or is suspected to have committed the offence of punishable under section 138 of Negotiable Instrument Act and a warrant of arrest issued by this Court against him has been returned unexecuted and that the said accused Mr. Vishwanth Vasu Morajkar, r/o House no:- 46, Mandrekarwada, Bicholim - Goa cannot be found and whereas it has been shown to my satisfaction that the accused Mr. Vishwanth Vasu Morajkar, r/o House no:- 46, Mandrekarwada, Bicholim Goa has absconded.

PROCLAMATION is hereby made that the said accused Mr. Vishwanth Vasu Morajkar, r/o House no:- 46, Mandrekarwada, Bicholim - Goa is required to appear before this Court to answer the complaint/charge on **28.04.2025 at 10.00 a.m.**

Given under my hand and the seal of the Court, this 24th day of February, 2025.

SEAL Sd/- **(Waseem Rizvi)**
Judicial Magistrate First Class "B" Court, Bicholim - Goa.
1/c Judicial Magistrate First Class "C" Court, Bicholim - Goa

**Proclamation for person Absconding Section 82 Cr.P.Code**

**IN THE COURT OF JUDICIAL MAGISTRATE FIRST CLASS AT BICHOLIM - GOA**

1073/OA/138/2019/B/C

The Bhatagram Urban Co-op Credit Society Ltd .... Complainant
V/S
Mrs. Sweta Ramesh Parwar ....Accused

WHEREAS a complaint has been made before this Court that the accused - Mrs. Sweta Ramesh Parwar, r/o 111/1, Harijanwada, Advalpal.Bicholim Goa 403503 has committed or is suspected to have committed the offence of punishable under section 138 of Negotiable Instrument Act and a warrant of arrest issued by this Court against him has been returned unexecuted and that the said accused - Mrs. Sweta Ramesh Parwar cannot be found and whereas it has been shown to my satisfaction that the accused - Mrs. Sweta Ramesh Parwar has absconded.

PROCLAMATION is hereby made that the said accused - Mrs. Sweta Ramesh Parwar, r/o 111/1, Harijanwada, Advalpal, Bicholim Goa 403503 is required to appear before this Court to answer the complaint/charge on **24.04.2025 at 10.00 a.m.**

Given under my hand and the seal of the Court, this 24th day of February, 2025.

SEAL Sd/- **(Waseem Rizvi)**
Judicial Magistrate First Class "B" Court, Bicholim - Goa.
I/c Judicial Magistrate First Class "C" Court, Bicholim - Goa

**Proclamation for person Absconding Section 82 Cr.P.Code**

**IN THE COURT OF JUDICIAL MAGISTRATE FIRST CLASS AT BICHOLIM - GOA**

656/OA/138/2021/B/C

The Bicholim City Multipurpose Co-operative Credit Society Ltd .... Complainant
V/s
Sushant Babal Gaonkar ....Accused

WHEREAS a complaint has been made before this Court that the accused - Mr. Sushant Babal Gaonkar, r/o H. No. 347, Brahamini wada, Kudchirem, Sankhali Goa has committed or is suspected to have committed the offence of punishable under section 138 of Negotiable Instrument Act and a warrant of arrest issued by this Court against him has been returned unexecuted and that the said Mr. Sushant Babal Gaonkar, r/o H. No. 347, Brahamini wada, Kudchirem, Sankhali Goa cannot be found and whereas it has been shown to my satisfaction that the accused Mr. Sushant Babal Gaonkar, r/o H. No. 347, Brahamini wada, Kudchirem, Sankhali Goahas absconded..

PROCLAMATION is hereby made that the said accused - Mr. Sushant Babal Gaonkar, r/o H. No. 347, Brahamini wada, Kudchirem, Sankhali Goa is required to appear before this Court to answer the complaint/charge on **07.04.2025 at 2:30 p.m.**

Given under my hand and the seal of the Court, this 12th day of February, 2025.

SEAL Sd/- **(Waseem Rizvi)**
Judicial Magistrate First Class "B" Court, Bicholim - Goa.
I/c Judicial Magistrate First Class

**Proclamation for person Absconding Section 82 Cr.P.Code**

**IN THE COURT OF JUDICIAL MAGISTRATE FIRST CLASS AT BICHOLIM - GOA**

571/OA/138/2022/B/C

The Bicholim Mahila Urban Co-op Credit Society Ltd .... Complainant
V/s
Mahadev Raghunath Gawas ....Accused

WHEREAS a complaint has been made before this Court that the accused - Mr. Mahadev Raghunath Gawas, r/o H/No. 117. Zarme Valpoi Sattari Goa has committed or is suspected to have committed the offence of punishable under section 138 of Negotiable Instrument Act and a warrant of arrest issued by this Court against him has been returned unexecuted and that the said accused - Mr. Mahadev Raghunath Gawas cannot be found and whereas it has been shown to my satisfaction that the accused - Mr. Mahadev Raghunath Gawas has absconded.

PROCLAMATION is hereby made that the said accused Mr. Mahadev Raghunath Gawas, r/o H/No. 117, Zarme Valpoi Sattari is required to appear before this Court to answer the complaint/charge on **21.04.2025 at 10.00 a.m.**

Given under my hand and the seal of the Court, this 24th day of February, 2025.

SEAL Sd/- **(Waseem Rizvi)**
Judicial Magistrate First Class "B" Court, Bicholim - Goa.
I/c Judicial Magistrate First Class "C" Court, Bicholim - Goa